# त्रिमुर्ती शिक्षण संस्थेचे,श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै.डॉ.भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय,साक्री जि.धुळे

# **राष्ट्रीय सेवा योजना**

---

**प्रा. शरद सोनवणे** - कार्यक्रम अधिकारी

**प्रा. डॉ. जहागीरदार साळुंखे** - सहाय्यक कार्यक्रम अधिकारी

**प्रा. डॉ. करूना अहिरे** - महिला कार्यक्रम अधिकारी

---

## अहवाल

## राष्ट्रीय सेवा योजना - नियमित कार्यक्रम

(शैक्षणिक वर्ष २०१९-२०)

श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकका मार्फत शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रथम सत्रामध्ये जे विविध कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात आले त्याचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे.

1. आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला.

दि. २१.०६.२०१९ रोजी श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. यादिवशी सकाळी ६ : ०० वाजता महाविद्यालयाच्या प्रांगणात योगाभ्यास करण्यात आला. यावेळी मा. प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे रासेयो कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी विकास अधिकारी व सर्व प्राध्यापक वर्ग आणि महाविद्यालयातील सर्व शिक्षेकेतर कर्मचारी उपस्थित होते.

2. वृक्षारोपण कार्यक्रम

दि. 1 ऑगस्ट 2019 रोजी त्रिमूर्ती शिक्षण संस्थेच्या सचिव मा. डॉ. मंगलाताई देसले यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. शासनाच्या वृक्ष लागवडीच्या अवाहनास प्रतिसाद देत महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या स्वयंसेवकांनी सदर वृक्षारोपणासाठी परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे रासेयो कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी विकास अधिकारी व सर्व प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

3. रक्तदान शिबिराचे आयोजन

श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयात दिनांक 2 ऑगस्ट 2019 रोजी 'रक्तदान व रक्तगट तपासणी शिबिर' संपन्न झाले. त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले यांच्या जयंती सप्ताहानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरामध्ये महाविद्यालयातील 28 विद्यार्थी रक्तदात्यांनी रक्तदान केले. त्रिमूर्ती शिक्षण संस्थेच्या सचिव मा. डॉ. मंगलाताई देसले, अध्यक्ष मा. श्रीमती मृणालताई देसले, सदस्य मा. डॉ. अजिंक्य देसले यांच्या प्रेरणेने व महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर संपन्न झाले. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना एकक आणि धुळे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त प्रयत्नातून सदर रक्तदान व रक्तगट तपासणी शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले. यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

4. रुग्णांना फळवाटप कार्यक्रम

दि. 4 ऑगस्ट रोजी त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे संचालक सदस्य मा.डॉ.अजिंक्य देसले यांच्या हस्ते साक्री येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळवाटप करण्यात आले. यावेळी साक्री ग्रामीण रुग्णालयाचे डॉ.श्रीकांत पाटील, देसले महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ.पी.एस.सोनवणे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

5. HIV - AIDS जनजागृती रैलीचे आयोजन.

रासेयो व सामान्य रुग्णालय साक्री यांच्या संयुक्तपणे दि. १३.०८.२०१९ रोजी HIV - AIDS जनजागृती रैलीचे व मानवी साखळीचे आयोजन करण्यात येऊन विद्यार्थ्यांना यासंबंधी सुरक्षित यौन संबंधाची व आपल्या जोडीदाराशी एकनिष्ठ राहण्याची शपथ देण्यात आली.

6. महात्मा गांधी १५० व्या जन्मशताब्दीवर्षा निमित्त दि.१६.८.२०१९ व्याख्यान व देशभक्तीपर गीतगायन कार्यक्रमचे आयोजन.

महात्मा गांधी १५० व्या जन्मशताब्दीवर्षा निमित्त महाविद्यालयात माजी शिक्षक आमदार मा. जयवंतराव ठाकरे यांचे "मोहन ते महात्मा" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी न्यू इंग्लिश स्कूल साक्री येथील संगीत शिक्षक श्री खैरनार सर यांनी देशभक्तीपर व महात्मा गांधी विषयक गीतगायन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ.पी.एस.सोनवणे रासेयो कार्यक्रम अधिकारी शरद सोनवणे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ जहागीरदार साळुंखे

महिला कार्यक्रम अधिकारी डॉ करूना अहिरे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

7. जिलेट गार्ड - करिअर गाईडन्स सेमिनार

रासेयो, सकाळ वृत्तसमूह व गीलेट गार्ड यांच्या संयुक्तपणे दि.५.०९.२०१९ रोजी विद्यार्थ्यांसाठी करिअर गाईडन्स सेमिनारचे आयोजन करण्यात आले. सकाळ - Young Inspirator Network च्या धुळे-नंदुरबार जिल्हा प्रतिनिधी मिस. जागृती बोरसे, साक्री तालुका क्रीडा मार्गदर्शक मा. श्री धनंजय सोनवणे या मान्यवरांनी विद्यार्थ्यांना करिअर विषयक मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ.पी.एस.सोनवणे रासेयो कार्यक्रम अधिकारी शरद सोनवणे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ जहागीरदार साळुंखे तसेच महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

8. रासेयो एक दिवशीय परिसर स्वच्छता व प्लास्टिक मुक्त परिसर शिबिराचे आयोजन

श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एकका मार्फत दिनांक १७.०९.२०१९ रोजी एक दिवशीय परिसर स्वच्छता व प्लास्टिक मुक्त परिसर शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेमधील स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

9. राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन कार्यक्रम दि. २०.०९.२०१९

दि. 20 सप्टेंबर 2019 रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना एककाचे उद्घाटन महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. पी.एस. सोनवणे यांच्या हस्ते झाले.

यावेळी बोलताना प्राचार्य पी.एस. सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यामध्ये सहभागी होऊन राष्ट्र उभारणी मध्ये पुढाकार घेण्याचे आवाहन केले. राष्ट्रीय सेवा योजना ही संस्काराची पाठशाळा असून, सुजान व संस्कारीत नागरिकासाठी आवश्यक असणारी जीवनमूल्ये विद्यार्थिदशेपासूनच विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे राष्ट्रीय सेवा योजना हे एक माध्यम आहे, असे मत माननीय प्राचार्य यांनी यावेळी नमूद केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी शरद सोनवणे यांनी केले रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ जहागीरदार साळुंखे यांनी प्रास्ताविक केले तर महिला कार्यक्रम अधिकारी डॉ करूना अहिरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी मंचावर डॉ वसुमती पाटील प्रा डी एल पाटील प्रा कैलास वाघ प्रा गुलाबसिंग पावरा व डॉ ममता पंजाबी प्रा अशोक भदाणे आदि उपस्थित होते.

10. रासेयो दिन, प्लास्टिक मुक्ती व तंबाखूमुक्ती अभियान कार्यक्रम दि. २४.०९.२०१९

दि. २४.०९.२०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना एकका मार्फत प्लास्टिक मुक्ती व तंबाखूमुक्ती अभियाना अंतर्गत विद्यार्थ्यांना प्लास्टिक मुक्ती व तंबाखूमुक्तीसंबंधी त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देत यावर कायमचा प्रतिबंध घालण्याची शपथ देण्यात आली. शेवाळी गावात प्लास्टिक मुक्ती व तंबाखूमुक्तीसंबंधी रैली काढण्यात आली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.पी.एस.सोनवणे रासेयो कार्यक्रम अधिकारी शरद सोनवणे सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ जहागीरदार साळुंखे महिला कार्यक्रम अधिकारी डॉ करूना अहिरे तसेच महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

11. महात्मा गांधी यांच्या १५० व्या जन्मशताब्दी निमित्त मतदार जागृती संबंधी व्याख्यानमालेचे आयोजन

दि. २.१०.२०१९ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंतीनिमित्त मतदार जनजागृती संबंधी "उत्सव लोकशाहीचा : हक्क मतदानाचा" या विषयावर प्रा. डॉ. विजय देसले यांचे व्याख्यान झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.पी. एस. सोनवणे हे अध्यक्षस्थानी उपस्थित होते. निवडणुका हा लोकशाही देशांमधील सर्वात मोठा उत्सव असून सर्व नागरिकांनी धर्म, वंश, जात या संकुचित भेदांच्या पलीकडे जाऊन, कोणत्याही आमिषाला बळी न पडता आपल्याला मिळालेल्या पवित्र मताधिकाराचा सदसदविवेकबुद्धीने वापर करावा; असे प्रतिपादन डॉ. विजय देसले यांनी आपल्या व्याख्यानात केले.

प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये विद्यार्थ्यांना मतदार यादी मध्ये आपले नाव सामाविष्ट करण्याचे आवाहन केले. आजची युवा पिढी हे उद्याचे सुजाण नागरिक आहेत आहेत, म्हणून सशक्त लोकशाही राष्ट्राच्या उभारणीसाठी मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य प्रत्येकाने पार पाडले पाहिजे; असे आवाहनही मा. प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे यावेळी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शरद सोनवणे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. जहागीरदार साळुंखे यांनी केले डॉ. करुणा अहिरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

12. ताणतणाव व्यवस्थापन व कौशल्यविकास कार्यशाळा दि.११.१०.२०१९

दि.२४.०९.२०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना एकका मार्फत विद्यार्थ्यांसाठी ताणतणाव व्यवस्थापन व कौशल्यविकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. पुण्यातील प्रसिद्ध डॉ. प्रशांत मंजिरे यांनी या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांच्या विविध समस्यां प्रश्नोत्तरांद्वारे समजून घेऊन त्यावर कशी मत करायची यासंबंधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे, रासेयो कार्यक्रम अधिकारी शरद सोनवणे, रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ जहागीरदार साळुंखे, महिला कार्यक्रम  अधिकारी डॉ करूना अहिरे तसेच महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

13. केंद्रीय सतर्कता आयोग - 'इमानदारी एक जीवनशैली' शपथ ग्रहण कार्यक्रम

दि.१.११.२०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना एकका मार्फत विद्यार्थ्यांना 'इमानदारी एक जीवनशैली' संबंधी  शपथ देण्यात आली. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शरद सोनवणे यांनी केले. प्रास्ताविक डॉ. जहागीरदार साळुंखे यांनी केले डॉ. करुणा अहिरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

14. बिरसा मुंडा यांची जयंती साजरी करण्यात आली. दि. १५.११.२०१९

राष्ट्रीय सेवा योजना एकका मार्फत आदिवासी क्रांतिवीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉ. पी एस सोनवणे यांनी व प्रा. गुलाबसिंग पवार यांनी आदिवासी क्रांतिवीर बिरसा मुंडा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे, रासेयो कार्यक्रम अधिकारी शरद सोनवणे, रासेयो सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ जहागीरदार साळुंखे, महिला कार्यक्रम  अधिकारी डॉ करूना अहिरे तसेच महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक

व शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

15. ‘२६ नोव्हेंबर-संविधान दिवस’ आयोजन व भारतीय संविधानाच्या सरनाम्याचे वाचन.

26 नोव्हेंबर संविधान दिन साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमापूजन व भारतीय संविधानाचे वाचन करून मोठ्या उत्साहात संविधान दिवस साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे माननीय प्राचार्य डॉ. पी एस सोनवणे यांनी संविधानाचे महत्व अधोरेखित करण्यात केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे, रासेयो कार्यक्रम अधिकारी शरद सोनवणे, डॉ. विजय देसले, प्रा. कैलास वाघ, प्रा. अभिजित भामरे आदीप्राध्यापक वृंद तसेच महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

16. फिट इंडिया - Walkathan

दिनांक 18 जानेवारी 2020 रोजी महाविद्यालयामध्ये फिट इंडिया कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. ह्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांबरोबरच महाविद्यालयातील प्राध्यापकांनी देखील सहभाग नोंदवला. यावेळी महाविद्यालयाचे डॉक्टर पी एस सोनवणे हे उपस्थित होते.

17. 'राष्ट्रीय मतदार दिन' आयोजन

दि. 25 जानेवारी हा 'राष्ट्रीय मतदार दिवस' साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना एकक व तहसील कार्यालय, साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार श्री विनोद ठाकूर हे उपस्थित होते. यावेळी साक्री तालुक्यात मतदार नोंदणी साठी उत्कृष्ट काम करणाऱ्या बीएलओ'ना प्रमाणपत्र देऊन नायब तहसीलदार श्री ठाकूर यांनी सन्मानित केले.

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख मार्गदर्शक व वक्ते म्हणून पिंपळनेर येथील कर्मवीर अ. मा. पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. बी. एस. कोठावदे हे उपस्थित होते. मतदार जनजागृती संबंधी आपल्या भाषणात प्रा. कोठावदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, मतदान हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे पवित्र असे मौलिक राष्ट्रीय कर्तव्य असल्याचे सांगितले. तसेच प्रत्येक 18 वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक युवक-युवतींनी आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करून सदसदविवेक बुद्धीने मतदानाचा हक्क बजावलाच

पाहिजे, तरच भारतीय लोकशाही  अधिक सुदृढ होऊ शकेल असे मत मांडले. नायब तहसीलदार श्री विनोद ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मतदार यादी मध्ये आपले नाव समाविष्ट करून घेण्याचे आवाहन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये मतदानाची घसरत चाललेली टक्केवारी हे लोकशाहीच्या निकोप वाढीसाठी चांगले लक्षण नसल्याचे नमूद करून, सर्व नागरिकांनी न चुकता मतदान केले पाहिजे; तरच भारताची लोकशाही बळकट होईल असे मत मांडले. या कार्यक्रमात उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना मतदान निष्ठेची शपथ देण्यात आली.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्तविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. शरद सोनवणे यांनी केले. प्रा. डॉ. जहागीरदार साळुंखे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला तर प्रा. डॉ. करूना अहिरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

18. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित एकपात्री नाटक

दि. २७.१.२०२० रोजी श्री. घरटे यांनी वर्तमान काळात छत्रपती संभाजी महाराज यांचे जीवन, विचार व कार्य कशाप्रकारे नवीन युवा पिढीस प्रेरणादायक आहेत यावर आधारित एकपात्री नाटक सादर केले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.

19 COVID-19 प्रादुर्भाव रोखण्यासाठी जनजागृती

संपूर्ण जगात तसेच भारतात आणि महाराष्ट्रात करोना साथीचा आजार पसरू लागल्यामुळे शासनाने दि 22 मार्चपासून  टप्प्याटप्प्याने टाळेबंदी लागू केली. या कालावधीत शासन व विद्यापीठाच्या आवाहनाला प्रतिसाद देत महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना मधील विद्यार्थ्यांनी करोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजात जनजागृती केली. तसेच शक्य असेल तेथे रासेयो स्वयंसेवकांनी प्रशासनाला सहकार्य केले. यासाठी महाविद्यालयाच्या रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले.

याप्रकारे, महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना एककाद्वारे शैक्षणिक वर्ष 2019 - 2020 मध्ये विद्यापीठ आदेशानुसार विविध प्रकारचे नियमित कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात आले.

**प्रा. शरद सोनवणे**
**कार्यक्रम अधिकारी**

**डॉ. पी. एस. सोनवणे**
**प्राचार्य**

# आंतरराष्ट्रीय योग दिवस















# वृक्षारोपण कार्यक्रम








## रुग्णांना फळवाटप (ग्रामीण रुग्णालय, साक्री)









# रक्तदान व रक्तगट तपासणी शिबीर











# HIV – AIDS जनजागृती कार्यक्रम













# महात्मा गांधी १५० व्या जन्मशताब्दीवर्षा निमित्त
# व्याख्यान व देशभक्तीपर गीतगायन कार्यक्रम











# जिलेट गार्ड - करिअर गाईडन्स सेमिनार

सकाळ





साक्री : 'सकाळ', 'यिन', 'जिलेट गार्ड'तर्फे येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात करिअर सेमिनारला उपस्थित अपर पोलिस अधीक्षक डॉ. राजू भुजबळ, प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, प्रा. डॉ. व्ही. बी. बच्छाव आदी. दुसऱ्या छायाचित्रात विमलबाई पाटील महाविद्यालयात उपस्थित तालुका क्रीडा मार्गदर्शक धनंजय सोनवणे, प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे, प्रा. डॉ. जहागीरदार साळुंके, प्रा. शरद सोनवणे आदी. (छायाचित्रे : धनंजय सोनवणे)

## न्यूनगंड दूर केल्यास यश निश्चित मिळेल

### डॉ. भुजबळ : सी. गो. पाटील व विमलबाई पाटील महाविद्यालयात मार्गदर्शन

सकाळ वृत्तसेवा

**साक्री, ता. ५ : आपण कुठलीही गोष्ट करताना नकारात्मक विचार जास्त करतो. अगदी स्पर्धा परीक्षांची तयारी करतानाही न्यूनगंड उराशी बाळगत असल्याने अपेक्षित यश मिळू शकत नाही. अशावेळी स्पर्धा परीक्षेसोबतच कुठल्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल, तर न्यूनगंड दूर करून सकारात्मकतेने सामोरे जा, निश्चित यश मिळेल, असे प्रतिपादन अपर पोलिस अधीक्षक डॉ. राजू भुजबळ यांनी केले.**

'सकाळ', 'यिन', 'जिलेट गार्ड'तर्फे येथील सी. गो. पाटील महाविद्यालयात 'यश आपल्या मुठीत' या विषयावर करिअर सेमिनार झाला. यावेळी डॉ. भुजबळ बोलत होते. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, प्रा. डॉ. व्ही. बी. बच्छाव, प्रा. भूषण अहिरराव, प्रा. ए. पी. निकम, प्रा. ए. पी. सोनवणे, प्रा. व्ही. बी. भामरे, प्रा. डॉ. पंकज अहिरे आदी उपस्थित होते.

**समाजसेवेची मिळते संधी**

शासकीय सेवेच्या माध्यमातून आपण इच्छित कार्य करू शकतो. समाजाची सेवा करण्याची संधी या माध्यमातून मिळते. तसेच आपली वेगळी ओळख निर्माण होते. अशावेळी अधिकारी व्हायचे असेल तर सातत्यपूर्ण व नियोजनबद्ध अभ्यास करण्याची आवश्यकता असल्याचे मत डॉ. राजू भुजबळ यांनी व्यक्त केले. प्राचार्य डॉ. अहिरे यांनी मनोगतातून सकाळ- यिनसह जिलेट गार्डच्या उपक्रमाची प्रशंसा केली. 'यिन'च्या जिल्हा समन्वयक जागृती बोरसे यांनी प्रास्ताविक केले तर प्रा. भूषण अहिरराव यांनी आभार मानले.

**संधीकडे देखील लक्ष द्या!**

शालेय तसेच महाविद्यालयीन जीवनात अभ्यासासोबतच खेळालाही महत्त्वाचे स्थान देऊन नियमित मैदानी खेळ खेळले पाहिजेत. खेळाच्या माध्यमातून अनेक करिअरच्या संधी आहेत, खेळांमध्ये विशेष प्रावीण्य प्राप्त केले असल्यास यात आपणास संधी मिळू शकते. स्पर्धा परीक्षांमध्ये तर विविध क्रीडा प्रकारांतील विद्यापीठ, राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये विजयी खेळाडूंना स्वतंत्र आरक्षणही असते. अशावेळी खेळातील या संधींकडे विद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे, असे आवाहन तालुका क्रीडा मार्गदर्शक धनंजय सोनवणे यांनी केले. येथील विमलबाई पाटील महाविद्यालयात 'यश आपल्या मुठीत' या विषयावर करिअर सेमिनार झाला. यावेळी श्री.सोनवणे बोलत होते. प्राचार्य डॉ. पी. एस. सोनवणे, प्रा. डॉ. जहागीरदार साळुंके, प्रा. शरद सोनवणे आदी उपस्थित होते. 'यिन'चे ग्रामीण जिल्हाध्यक्ष प्रकाश पाटील, रस्ता सुरक्षा महामंडळ अध्यक्ष सुशांत देवरे, सदस्य ललितेश गायकवाड, कुणाल जाधव, मनोज अमृतकर आदींनी संयोजन केले.

**क्षमता ओळखून करिअर निवडा**

करिअरची निवड करताना आपल्या क्षमता ओळखून याची निवड झाली पाहिजे. आपण ज्या क्षेत्रात यशस्वी होऊ शकतो, तेच क्षेत्र निवडले पाहिजे. सर्व गुणसंपन्न कुणीही नसते, मात्र आपल्या क्षमता ओळखून व आपल्यातील कौशल्याचा सदुपयोग केला, तर यशस्वी होणे फारसे अवघड नसल्याचे मत धनंजय सोनवणे यांनी केले. प्राचार्य डॉ. सोनवणे यांनी मनोगत व्यक्त करत सकाळ- यिन सह जिलेट गार्डच्या उपक्रमाची प्रशंसा केली.

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

सकाळ




Jalgaon, Dhule-Today
06/09/2019 Page No. 4







is like a book. it takes Few Seconds to burn..
but it takes Years to write..


Latitude: 20.995243
Longitude: 74.306392
Elevation: 426.68m
Accuracy: 16.1m
Time: 09-05-2019 13:08





# परिसर स्वच्छता व प्लास्टिक मुक्त परिसर शिबिर
















# राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन कार्यक्रम











# प्लास्टिक मुक्ती व तंबाखूमुक्ती अभियान कार्यक्रम













**महात्मा गांधी यांच्या १५० व्या जन्मशताब्दी निमित्त**

**मतदार जागृती संबंधी व्याख्यान**






## ताणतणाव व्यवस्थापन व कौशल्यविकास कार्यशाळा दि.११.१०.२०१९






## २६ नोव्हेंबर-संविधान दिवस’ आयोजन



**फिट इंडिया - Walkathan**






## 'राष्ट्रीय मतदार दिन' आयोजन






**एक दिवशीय रासेयो श्रमसंस्कार कार्यशाळा**





**रासेयो दिन, प्लास्टिक मुक्ती व तंबाखूमुक्ती अभियान कार्यक्रम दि. २४.०९.२०१९**







The true guidance is like a small lamp in a dark.
forest, it dosent show everything at once, but gives enough.
light for the next step to be safe.
2019.09.24 11:12


2019.09.24 11:11